भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १४८ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०३/२०१८

**१) मोटार सायकलची चोरी :-**

दिंनाक २०/०३/२०१८ चे १९.३० ते २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ईश्वर दादाजी दिवटे वय ३३ वर्ष, रा. गांधी चौक लाखांदुर याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ०८२८ किंमती १५,०००/—रु. ची चपराड शेत शिवार बाबा पठाण यांचे शेतात ठेवलेली हिरोहोंडा स्प्लेन्डर ही कोणीरती अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन जखमी :-**

दिंनाक २१/०३/२०१८ ते २३.३० वाजता यातील आरोपी चालाकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन रोडाचे साईडचे झाडाला धडक दिल्याने त्याचे सोबत असलेला क्लिनर विकास कृष्णा चौधरी वय १८ वर्ष, रा. भिलाई याला गंभिर जखमी व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी राजकुमार नान्हे यांचे चौकशी अहवाला करुन व जखमीचे वैद्यकीय परीक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी :-**

दिंनाक १९/०३/२०१८ ते २१.०० वाजता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६/१०३१ ही हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन रोडचे डिव्हायडरला धडक मारुन आरोपी व त्याचा मित्र अविनाश असे दोघेही जखमी झाल्याने पोस्टे भंडारा जावक क्र. १५७५/१८ दिनांक २०/०३/२०१८ अन्वये आज रोजी पत्र प्राप्त झाल्याने सपोनी म्हसकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :-**

**अ)** दिनांक २२/०३/२०१८ चे ११.३६ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा एस वाहन हा बावनकर चौक तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. धावळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १९/०३/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा एस वाहन बोस वार्ड तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. उबाळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**क)** दिनांक २२/०३/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा एस वाहन हा बावनकर चौक येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत

**ड)** दिनांक २२/०३/२०१८ चे २०.१५ ते २१.१८ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही बावनकर चौक तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. शहारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत

**५) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :-**

दिंनाक २२/०३/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक माधव गोरोबा राऊत वय ६० वर्ष, रा. कुडेगाव हा शेतात गव्हाचा चुरणा आटोपुन गव्हाचा उम्बया जमा करीत असता अचानक चक्कर येवुन पडल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रा. रु. लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने व हुदय विकाराच्या झटक्याने मृत्यु झाला असावा असे फिर्यादी नागेश्वर माधवराव राऊत वय २७ वर्ष, रा. कुडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत.

**६) अवैध दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :-**

दिनांक २२/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन करडी, गोबरवाही, लाखांदुर, भंडारा व साकोली येथे अवैध दारु/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी दारु किंमती ३२००/-रु. ३ लिटर २४० मिली लिटर देशी दारु किंमती ९३६/-रु. तसेच जुगारातुन किंमती २४८५/-रु. असा एकुण किंमती ६,६२१/-रु. चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक २२/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी १ त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता ४ ईतर वाहनांवरती - ९२ केसेस करण्यात आले आहे.

(पोनी. एस.टी. घुसर )
**स्थागुशा भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६१९९९१**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.